# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २४५ /०८ दिनांक :

१) श्री. समृध्दी इंडस्ट्रीज लिमिटेड,
एन– १७, एम.आय.डीसी., अर्जदार
कुपवाड ब्लॉक, जिल्हा सांगली.

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडल कार्यालय, विश्रामबाग,
सांगली.

२) कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित. विरूध्द पक्षकार
शहर विभाग, सांगली.

३) उप कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
उपविभागीय कार्यालय, माधवनगर,

जि. सांगली

**कोरम** :– १)  श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२)  श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३)  श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार



## न्याय निर्णय

श्री. के.वाय. जगताप, ग्रा.त.नि.मंच यांचेतर्फे    दिनांक : ०६.०१.२००९

प्रस्तुत अपील हे मूळ तक्रारदार यांनी ता. ५.७.२००८ रोजी अ फॉर्ममध्ये अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे दिलेल्या अर्जावरील ता. ९.८.२००८ चे निर्णयाविरुध्द दाखल करण्यात आलेले आहे. अर्जदार ही औंद्योगिक रजिस्टर्ड संस्था आहे. एम.आय.डी.सी. कुपवाड येथे त्यांचा समृध्दी इंडस्ट्रीज लि. असा उद्योग आहे. या उद्योगासाठी नवीन विजेचे कनेक्शनची त्यांनी मागणी केलेली होती. संबंधित औंद्योगिक जागेमध्ये पूर्वी उच्चदाब ग्राहक मे. कृष्णा सिमेंट हे होते. त्या पूर्वीच्या ग्राहकाकडे ता. ३०.६.२००८ अखेर थकबाकी रु. १८,९७,५२५.२९ झाली असल्याने सदरचे अर्जदार औंद्योगिक संस्थेस विद्युत पुरवठा करणे बाबत वि.प.तर्फे असमर्थतता दर्शविली व त्यामध्ये पूर्वीच्या ग्राहकाकडे असणारी बाकी भरणे बाबत अथवा सदरची बाकी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय लागलेनंतरचे ठरणारे अर्जदार भरतील असे खात्रीपत्र लिहून देणे बाबत अर्जदारास कळविले. अर्जदाराचे म्हणणे की, कृष्णा सिमेंट यांचेकडे असलेली बिलाची मागील ६ महिन्यांची थकबाकी ते भरण्यास तयार होते व आहेत. मात्र वि.प.ने मागणी केल्याप्रमाणे कोणत्याही प्रकारचे हमी पत्र अथवा खात्री पत्र ( Undertaking ) देण्यास त्यांची तयारी नाही. त्यांचे म्हणणे की, पूर्वीच्या ग्राहकाकडून जी बाकी येणे आहे ती रक्कम पूर्वीचे ग्राहकाकडून वसूल करण्याचा वि.प.स अधिकार आहे. सदरील अर्जदाराने औंद्योगिक मिळकत विकत घेतली असल्याने त्यांना पूर्वीची वीज थकबाकी भरण्याची आवश्यकता नाही.

वरील प्रमाणे मुद्‌द्यांबाबत अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षापुढे दोन्ही बाजूंची सुनावणी झाली व त्यामध्ये ता. ९.८.२००८ रोजी आदेश देण्यात आला. त्यामध्ये वि.प.ने मागणी केल्याप्रमाणे पूर्वीच्या ग्राहकाची बाकी रक्कम भरण्यात यावी म्हणजे वितरण कंपनीचे पत्र क्र. ४७७० ता. १३.६.२००८ मध्ये कळविल्याप्रमाणे रक्कम भरावी असे कळविण्यात आले व त्याची पूर्तता झाल्यानंतर विद्युत पुरवठा करण्यात यावा.

अशा निर्णयाविरुध्द या मंचाकडे ग्राहकाकडून अपील दाखल करण्यात आले व या बाबत वि.प. यांना नोटीस पाठवून त्यांचे म्हणणे मागविण्यात आले.

वि.प.चे म्हणणे की, संबंधित औंद्योगिक वसाहतीमध्ये जी जागा सदर अर्जदार औंद्योगिक संस्थेकडे आहे त्यामध्ये मे. कृष्णा सिमेंट यांना उच्चदाबाचा विद्युत पुरवठा करण्यात आला होता. तो पूर्वीच्या ग्राहकाचा प्लॉट हा

श्री. मगदूम या नावाच्या गृहस्थाने कोर्ट लिलावामध्ये विकत घेतला व त्याचेकडून सदरचे मे. समृध्दी इंडस्ट्रीज लि. यांनी तो विकत घेतला. पूर्वीचे ग्राहक मे. कृष्णा सिमेंट यांचेकडे रक्कम रु. १८,९७,५२५.२९ अशी बाकी ता. ३०.६.२००८ अखेर आहे. ती रक्कम न आल्याने त्यांचा विद्युत पुरवठा कायमस्वरुपी बंद करण्यात आलेला होता. पुढे विशेष मुकदमा क्र. २८७/९६ असा त्यांचेविरुध्द येणे बाकी वसुलीसाठी दिवाणी न्यायालयात दावा दाखल करण्यात आला होता. त्या बाबतचा न्याय निर्णय वितरण कंपनीच्या बाजूने झाला आहे व ते प्रकरण दरखास्त नं. १६६/०७ ने मे. कृष्णा सिमेंट यांचेविरुध्द वसुलीसाठी न्यायालयात आहे. त्या वसुली प्रकरणामध्ये एकूण रक्कम रु. १०,१२,०६६.३८ व पुढील व्याज द.सा.द.शे. ७% प्रमाणे वसूल होणेसाठी विनंती केलेली आहे. वरील प्रकरण सांगली येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठस्तर यांचेपुढे न्यायप्रविष्ट आहे.



वरील परिस्थितीमध्ये अर्जदार मे. समृध्दी इंडस्ट्रीज लि. यांनी ता. १५.५.२००८ रोजी विद्युत पुरवठा मिळणे बाबत अर्ज केला. त्यामध्ये अधीक्षक अभियंता, सांगली यांचेकडील पत्र क्र. ५४७२ ता. ५.६.२००८ प्रमाणे असे कळविण्यात आले होते की, अर्जदाराकडून कृष्णा सिमेंटचा विद्युत पुरवठा बंद करणेपूर्वी मागील ६ महिन्यांचे वसूल न झालेली कृष्णा सिमेंटची विजेची आकारणी भरण्याच्या अटीवर तसेच वितरण कंपनीतर्फे वाणिज्य परिपत्रक क्र. ५३ ता. ७.५२००७ चे अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर कनेक्शन देण्यात यावे असे कळविण्यात आले. तसेच याच म्हणण्यामध्ये वितरण कंपनीतर्फे सांगण्यात आले की, सदरील ग्राहकास सद्या मागणी केल्याप्रमाणे, सध्या संबंधित ठिकाणी विजेचा भार शिल्लक नसल्याने अर्जदारास असे कनेक्शन देता येत नाही.

या प्रकरणामध्ये, सांगली येथील कॅम्पमध्ये अर्जदारातर्फे प्रतिनिधी श्री. एस.पी. पारकर यांचा युक्तीवाद ऐकला. या उलट, वि.प.तर्फे श्री. जाधव, श्री. पाडळकर या अधिकाऱ्यांचे युक्तीवाद ऐकले.

अर्जदारांचे म्हणणे की, त्यांनी खरेदी केलेल्या प्लॉटवर वि.प.चा कोणत्याही प्रकारचा बोजा नसल्याने त्यांनी खरेदी केलेली मिळकत ही वि.प.चे बोजा विरहित असल्याने, वि.प.चे कोणत्याही प्रकारचे देणे देण्यास सदरचा ग्राहक बांधील नाही. तरीपण सदरच्या ग्राहकाने स्वखुषीने मागील ६ महिन्यांची थकबाकीची रक्कम रु. ३,८९,६८७.३९ वितरण कंपनीस भरण्याची तयारी दर्शविली आहे. मात्र वर उल्लेख केलेल्या वाणिज्य परिपत्रकातील इतर अटी म्हणजे खात्री पत्र ( Undertaking ) लिहून देण्याची शर्त त्यांना मान्य नाही. वि.प.तर्फे म्हणणे की, वाणिज्य परिपत्रक क्र. ५३ ता. ७.५.२००७ या मधील अटी/शर्तीची पूर्तता करणे आवश्यक आहे व त्या शिवाय ग्राहकास विद्युत पुरवठा करता येणार नाही, असा युक्तीवाद मांडला.

वरील दोन्ही पक्षकारांची आमच्या समोर आलेली कागदपत्रें तसेच त्यांच्यातर्फे करण्यात आलेला युक्तीवाद याचा कायद्यातील तरतुदी संदर्भात विचार केला असता, या अर्जाचे निर्णयाकामी खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित होतात.

१) वाणिज्य परिपत्रक क्र. ५३ ता. ७.५.२००७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सदरचा नवीन ग्राहक समृध्दी इंडस्ट्रीज यांना मागील ग्राहकाची बाकी देणे बाबत खात्रीपत्र ( Undertaking ) व त्या संबंधात त्यांच्या मिळकतीवर बोजा चढविण्याबाबतचे दस्तऐवज करुन देणे आवश्यक आहे काय ?

उत्तर : नाही

२) अर्जदार समृध्दी इंडस्ट्रीज लि. यांनी मागणी केल्याप्रमाणे विद्युत पुरवठा मिळणेचा त्यांना हक्क आहे काय ?

३)

उत्तर : होय. मात्र मागील ६ महिन्यांच्या विद्युत आकाराची थकबाकी रक्कम रु. ३,८९,६८७.३९ भरण्याच्या

अटीवर.

४) आदेश ?

उत्तर : अखेरच्या आदेशाप्रमाणे



<u>कारणमिमांसा</u>

आमच्यासमोर आलेल्या कागदपत्रांवरुन, सदरील अर्जदार समृध्दी इंडस्ट्रीज लि. यांनी एम.आय.डी.सी. कुपवाड ब्लॉक, सांगली येथे एन १७ हा प्लॉट व मिळकत श्री. मगदूम यांचेकडून रजिस्टर खताने विकत घेतली आहे. श्री. मगदूम यांनी तो प्लॉट मे. कृष्णा सिमेंट यांची मिळकतीचा कोर्ट लिलाव झाला त्यामध्ये विकत घेतली होती. मूळ मालक व पूर्वीचे ग्राहक मे. कृष्णा सिमेंट लि. यांचेकडे वि.प.ची रक्कम रु. १८,९७,५२५.२९ एवढी येणे बाकी होती. त्याबाबत दिवाणी न्यायालयामध्ये स्पेशल मुकादमा क्र. २८७/९६ वितरण कंपनीतर्फे दावा दाखल करण्यात आला होता व त्याचा निकाल वितरण कंपनीच्या बाजूने झाला आहे. त्या निकालाप्रमाणे मे. कृष्णा सिमेंट लि. यांचेविरुध्द सांगली दिवाणी न्यायालयाकडे १६६/०७ अशी दरखास्त रक्कम रु. १०,१२,०६६.३८ व त्यावरील पुढील व्याज द.सा.द.शे. ७% प्रमाणे वसुली बाबतची कारवाई न्यायप्रविष्ट आहे. त्या कारवाईमध्ये आजपर्यंत किती रक्कम वसूल झाली याबाबत वि.प.तर्फे कोणत्याही प्रकारची माहिती देण्यात आली नाही.

वरील परिस्थितीमध्ये, वितरण कंपनीतर्फे वाणिज्य परिपत्रक क्र. ५३ ता. ७.५.२००७ चा आधार घेण्यात आलेला आहे. त्यामध्ये अशा पूर्वीच्या थकबाकीदार असलेल्या औंद्योगिक संस्थेस नवीन खरेदीदार अथवा वारसदार संस्थेकडे जर ती मिळकत आलेली असेल व विद्युत पुरवठ्याची नवीन संस्थेने मागणी केली असेल तर अशा वेळी कांही अटी/शर्ती नमूद केलेल्या आहेत. त्या संबंधित अटी खालील प्रमाणे होत.

1) Before release of electricity connection, following methodology should be adopted. We shall obtain an undertaking from such consumer that he undertake that in case the decisioin in Appeal No. 5312-5313 of 2005 MSEB and Anr. V.s Super & Stainless HI Alloys Ltd. & Ors. With Civil Appeal No. 5314 of 2005. SLP No. 10732 of 2006 and SLP No. © No. 6068 of 2006 pending in the Supreme Court goes in favour of M.S.E.B. that he will pay the entire arrears along with interst at the prevailing rate till the date of payment on the amount i.e. due at the time of release of connection due on the premises towards electricity charges.

2) We shall claim arrears of electricity charges as per condition No. 10.5 of the Supply Code without prejudice to our right in the pending appeal before Apex Court in addition to undertaking as referred in (1) above.

For recovery under the regulation 10.5 of the Supply Code the amount shall be calculated as under :

i) The reference date should be the date of temporary disconnectioin.
ii) All the energy charges including the components of the tariff pertaining to consumption during that month shall be recoverable.
iii) The period of such recovery under (ii) shall be for six months prior to the date of disconnection.
iv) The arrears and the interest, DPC, etc. thereon shall be shown separately in the subsequent bills also. Till such time Apex Court decides on our case or the consumer fully pays the amount as per our records.

3) Further, in order to securitize the arrears which the consumer has undertaken to pay to MSEDCL in the event the Apex Court decides in our favour, a charge will have to be created on the said property by the consumer through the legal procedure and the connection shall be released only subject to creation of such charges on the property documents of the consumer.



वरील अटीबाबत पूर्वीच्या ग्राहकाचा विद्युत पुरवठा बंद करण्यापूर्वीचे ६ महिन्यांची बाकी रक्कम भरण्या बाबत सदरील अर्जदार यांनी सहमती दर्शविली आहेव व त्या संबंधात ता. २५.११.२००८ रोजी त्यांनी या मंचाकडे तसे लेखीही कळविले आहे. ती रक्कम म्हणजे जी वि.प.ने कळविली आहे ती रक्कम रु. ३,८९,६८७.३९ अशी होय. या अटी व्यतिरिक्त वाणिज्य परिपत्रकातील अन्य अटी सदरील अर्जदारास मान्य नाहीत. कारण त्यांचे म्हणणे की, दिवाणी दावा दाखल करण्यापूर्वी अथवा सदरची मिळकत या ग्राहकाने खरेदी करेपर्यंत वितरण कंपनीतर्फे कृष्णा सिमेंट यांचेकडील येणे रकमेचा बोजा सदर मिळकतीवर चढविलेला नव्हता व नाही. सबब मिळकत विकत घेणारी व्यक्ती ही पूर्वीच्या येणे रकमेस जबाबदार नाही. तसेच दिवाणी न्यायालयातील दाव्याचा निकाल हा कृष्णा सिमेंट यांच्या विरुध्द झाला आहे. त्याप्रमाणे पैंसे देण्याची जबाबदारी कायद्याप्रमाणे मिळकत विकत घेणाऱ्याची येत नाही. मिळकत हस्तांतरण कायदा (T.P.Act) याचा विचार करता, जेंव्हा एखादा बोजा मिळकतीवर अधिकृतरित्या नोंदविला नसेल, त्यावेळी मिळकत विकत घेणारी व्यक्ती ही त्या मिळकतीच्या संदर्भातील देण्याबाबत अनभिज्ञ असलेने, अशी रक्कम देण्यावरुन मिळकत विकत घेणाऱ्यावर जबाबदारी येत नाही.

आमच्यासमोर वाणिज्य परिपत्रक क्र. ५३ ता. ७.५.२००७ चा जो ऊहापोह करण्यात आलेला आहे त्यामध्ये वितरण कंपनीने SLP No. 10732/ 2006 व SLP No. 6068 / 2006 हा मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केल्याचे निर्देशित केले आहे. मात्र या अशा प्रकरणामध्ये कांही स्थगनादेश अथवा कांही आदेश जे पूर्वीच्या ग्राहकाच्या विरुध्द रक्कम वसुली संदर्भात केला आहे किंवा कसे या बाबत आमच्या समोर कांही दस्तऐवज अथवा निवाडा दाखल केलेला नाही. परिणामी, केवळ एखादे प्रकरण न्यायालयात दाखल आहे त्यावरुन ग्राहकांना कांही अटी/शर्ती घालून त्यांचा विद्युत पुरवठा आडवला जावा असे अभिप्रेत होत नाही. तसेच या ठिकाणी अर्जदार समृध्दी इंडस्ट्रीज तर्फे श्री. पारकर यांचे म्हणणे की, वाणिज्य परिपत्रक क्र. ५३ ता. ७.५.२००७ यास महाराष्ट्र वीज नियामक आयोगाची मान्यता आहे असा उल्लेख केलेला नाही. तसेच त्या बाबत अन्य कागदपत्रेंही दाखल केलेली नाहीत. महाराष्ट्र वीज नियामक आयोग विद्युत पुरवठा संहिता व विद्युत पुरवठा इतर अटी) विनियम २००५ मधील कलम १९.२ प्रमाणे या विनियमाच्या २० जानेवारी २००५ च्या अगोदरची परिपत्रके संपुष्टात आलेली आहेत. तसेच प्रस्तुत वाणिज्य परिपत्रक क्र. ५३ ता. ७.५.२००७ बाबत आयोगाची मान्यता घेतल्याबाबतचा उल्लेख सदरील निवेदनात नसलेने ते

परिपत्रक ग्राहकावर बंधनकारक होवू शकत नाही असे या मंचाचे मत आहे व तसा युक्तीवाद श्री. पारकर यांनी केला हे आम्हास ग्राह्य वाटते. परिणामी, वाणिज्य परिपत्रक क्र. ५३ ता. ७.५.२००७ मधील अटी/शर्ती ग्राहकावर बंधनकारक नाहीत. मात्र अर्जदार यांनी मे.कृष्णा सिमेंट लि. यांची मागील ६ महिन्यांची वसूल न झालेली रक्कम रु. ३,८९,६८७.३९ भरण्याची तयारी दर्शविली आहे. सबब अशी रक्कम स्वत: त्यांनी भरण्याचे कबूल केल्याने अशी रक्कम भरणे त्यांचेवर बंधनकारक आहे. तसेच अशी रक्कम भरुन घेवून तक्रार अर्जदारास महाराष्ट्र वीज नियामक आयोग विद्युत पुरवठा संहिता व विद्युत पुरवठा इतर अटी) विनियम २००५ मधील विनियम १०:५ प्रमाणे अटी/शर्तींची पूर्तता करुन घेवून विद्युत पुरवठा करणे आवश्यक ठरते.

वरील कारणमिमांसेचा विचार करता, वरील मुद्दा क्र. १ व २ कडे आम्ही आमचे निष्कर्ष नोंदवित आहोत. परिणामी, अर्जदाराचे अपील मंजूर करणे आवश्यक व क्रमप्राप्त आहे. सबब खालील प्रमाणे आदेश.



## आदेश

१) अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचा दिनांक ९.८.२००८ रोजी सदरच्या तक्रार अर्जदारा संबंधात दिलेला निर्णय रद्द करण्यात येत आहे.

२) अर्जदार यांनी रक्कम रु. ३,८९,६८७.३९ (पूर्वीचे ग्राहकाची अखेरची ६ महिन्यांची थकबाकी ) वितरण कंपनीकडे भरणेचे अटीवर तसेच महाराष्ट्र वीज नियामक आयोग विद्युत पुरवठा संहिता व विद्युत पुरवठा इतर अटी) विनियम २००५ मधील इतर अटींची पूर्तता ग्राहकाकडून करुन घेवून अर्जदार यांना मागणी प्रमाणे विद्युत पुरवठा करण्यात यावा.

३) खर्चा बाबत आदेश नाही

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( काकासाहेब य . जगताप )
अध्यक्ष,
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : ०६.०१.२००९

श्री. जी.सी लेले, ग्राहक सदस्य ..

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव ..

<u>श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव, ग्राहक तक्रार निवारण मंच यांचे मत</u>

कुपवाड औंद्योगिक वसाहत, सांगली येथील प्लॉट क्र. एन १७ मध्ये मे. समृध्दी इंडस्ट्रिज लि. यांनी वितरण कंपनीकडे २० अश्वशक्तीचे थ्री फेज नवीन औंद्योगिक कारणासाठी वीज जोडणीची मागणी केली आहे. वितरण कंपनीकडून सदर जागेत पूर्वीचे मालक मे. कृष्णा सिमेंट यांचे नांवे असलेल्या वीज जोडणीवर वीज बिलाची थकबाकी असलेने, त्या जागेत तक्रारदाराने मागणी केलेले नवीन वीज जोडणी देता येणार नाही असा पावित्रा घेतल्यामुळे ग्राहकाने सदर जागेत म.रा.विद्युत आयोगाच्या विनियम २००५ च्या तरतुदीनुसार नवीन वीज जोडणी मिळावी अशी मागणी केली आहे.

या बाबत अर्जदाराने अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सांगली यांजकडे क्ष नमुन्यात तक्रार दि. ४.७.२००८ रोजी दाखल केली होती. त्यावर कक्षाने आदेशाचे पत्र क्र. ७८११ दि. ९.८.२००८ ने निकाल दिला आहे. सदर निकाल मान्य न झालेमुळे ग्राहकाने ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे दि. ७.१०.२००८ रोजी अपील अ नमुन्यात दाखल केले आहे. त्यानुसार मंचाने कार्यवाही सुरु केली. संबंधित नोडल ऑफिसर यांजकडून मुद्देनिहाय माहितीची मागणी करण्यात आली. त्याप्रमाणे तक्रार प्रकरणाची सुनावणीची तारीख २७.११.२००८ रोजी दुपारी ३.०० वाजता सांगली मंडल कार्यालय येथे ठेवण्यात आली. तथापी मंचाच्या अध्यक्षांच्या सूचनेनुसार सदर सुनावणी रद्द करुन पुढे दिनांक १.१२.२००८ रोजी सांगली येथे ठेवण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारदारांचे प्रतिनिधी श्री. पारकर, वि.प.चे नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्री. जेधे, सांगली मंडल, श्री. पडळकर, उप कार्यकारी अभियंता, माधवनगर उप विभाग इ. हजर होते.

<u>ग्राहकाने आपली बाजू खालील प्रमाणे मांडली</u>

मे. समृध्दी इंडस्ट्रीज यांनी पूर्वी मे. कृष्णा सिमेंट यांचे नांवे असलेली कुपवाड एम.आय.डी.सी. सांगली शहर येथे प्लॉट क्र. एन १७ कुपवाड ही जागा कोर्टातर्फे केलेल्या लिलावात विकत घेतली आहे. सदर जागेत नवीन मालक मे. समृध्दी इंडस्ट्रीजचे नांवे २० अश्वशक्ती वीज जोडणी मिळणेसाठी दि. १५.५.२००८ ला अर्ज केला आहे. त्यावर अद्यापपावेतो कार्यवाही झालेली नाही. दरम्यान वितरण कंपनीकडून अधीक्षक अभियंता, सांगली मंडल यांचे पत्र क्र. ५४७२ दि. ५.७.२००८ ने खालील मुद्दे कळविण्यात आले. सदर जागेत त्यापूर्वी

मे. कृष्णा सिमेंट यांच्या नांवे असलेल्या उच्चदाब वीज जोडणीवर दिनांक ३०.६.२००८ अखेर रु.१८,९७,५२५.२९ वीज बिलापोटी येणे आहे. सदर रकमेचा भरणा न झालेमुळे वीज पुरवठा कायमस्वरुपी बंद करण्यात येवून संबंधितांचे विरुध्द विशेष दिवाणी दावा क्र. २८७/९६ ने थकबाकी रक्कम रु. १३,१४,३१६.८३ वसुली करता दावा दाखल करण्यात आला. त्याचा निकाल वितरण कंपनीच्या बाजूने लागला. तदनंतर कार्यवाही करिता अपील क्र. १६६/०७ हे संबंधितां विरुध्द रु. १०,१२,०६६.३८ व पुढील व्याज द.सा.द.शे. ७% दाव्याच्या दिनांका पासून धरुन वसुलीसाठी मा. दिवाणी कोर्ट सब डिव्हीजन सांगली येथे प्रलंबित आहे.

तसेच वितरण कंपनीच्या मुख्य कार्यालय, मुंबई वाणिज्य परिपत्रक क्र. ५३ दि. ७.५.२००७ ने अशा जागेत वीज पुरवठा घेणे करिता खालील मुद्द्यांची अ.क्र. १ ते ३ पूर्तता करण्यास कळविले आहे.



१) ज्या वीज जोडण्या कोर्ट लिलावामध्ये विकत घेण्यात आल्या आहेत व ज्यांच्या पूर्वीच्या वीज बिलाच्या येणे थकबाकी आहेत, त्या प्रकरणात वितरण कंपनीने मे. सूपर अॅन्ड स्टेनलेस एच.आय. लि. यांच्या विरोधात केलेला दावा क्र. ५३१२, ५३१३ ऑफ २००५ व दिवाणी याचिका ५३१४ ऑफ २००५ मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे व त्यावर निर्णय होणे आहे. म्हणून अशा प्रकरणात नवीन वीज पुरवठा घेवू इच्छिणाऱ्या अर्जदारांनी त्या निकालास आधीन राहून त्या जागेतील पूर्वीच्या वीज जोडणीवरील वीज बिलाची सर्व थकबाकी व्याजासह भरु असे हमीपत्र लिहून द्यावे.

२) पूर्वीची वीज जोडणी कायमस्वरुपी बंद केल्याच्या अगोदरचे ६ महिन्यांचे मे. कृष्णा सिमेंट यांचे वीज बिलाची रक्कम रु. ३,८९,६८७.३० विद्युत नियामक आयोगाच्या वीज पुरवठा अटी कलम १०:५ नुसार भराव्यात.

३) जर अपेक्स कोर्टात वितरण कंपनीच्या बाजूने निकाल झाल्यास अर्जदाराने हमी घेतलेल्या वीज बील थकबाकीची खात्री देणेकरिता संबंधित मालमत्तेवर ग्राहकाने कायदेशीर मार्गाने बोजा चढविण्यात यावा आणि ग्राहकाच्या सदर मालमत्ता कागदपत्रांवर असा बोजा चढविल्यानंतरच कनेक्शन देण्यात यावे.

पुढे तक्रारदाराने मागणी केली आहे की, विद्युत कायदा २००३ कलम ४३ (१) नुसार वि.प.ने एक महिन्यात वीज पुरवठा करणे होते. अन्यथा रु.१०००/- प्रति दिन प्रमाणे कलम ४३ (३) नुसार कारवाई व्हावी. या शिवाय वीज पुरवठ्याच्या अटी व संहितानुसार नियामक आयोग विनियम २००५ नुसार देय भरपाई लागू व्हावी. वीज नियामक आयोग विनियम २००५ तरतूद १०:५ विचारात घ्यावी. प्रथमत: ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवाारण कक्षात ४.७.२००८ ला क्ष फॉर्ममध्ये तक्रार दाखल केली होती. त्यावर वि.प.ने अधी. अभि. सांगली मंडल पत्र क्र. ५४७२ दि. ५.७.२००८ ने कळविलेल्या अटींच्या कारणास्तव वीज पुरवठा देणेस नकार दिला आहे. या बाबत तक्रारदाराने नवीन वीज जोडणी विद्युत कायदा २००३

कलम ४३ व वीज वीज नि.आयोग वीज पुरवठ्याच्या अटी विनियम २००५ तरतूद १०:५ नुसार चौंकटीत व्हावी अशी मागणी केली आहे. वितरण कंपनीकडून सदर जागेच्या पूर्वीच्या मालकाविरोधात असलेल्या वीज बील थकबाकी वसुलीबाबत स्वतंत्रपणे कायदेशीर कारवाई चालू असलेने त्याचा नवीन वीज मागणीशी संबंध पोहोचत नाही व ग्राहकाने त्या जागेतील पूर्वीच्या कायमस्वरुपी वीज जोडणी बंद केलेल्या वीज जोडणीची तेंव्हापासून मागील सहा महिन्यांची वीज बील देय रक्कम भरण्याची तयारी दाखविली आहे व वितरण कंपनीचे परिपत्रक क्र. ५३ दि. ७.५.२००७ मधील अटींची पालन करण्यास विरोध दर्शविला आहे.

या बाबत वितरण कंपनीकडून खालील प्रमाणे म्हणणे मांडले गेले.

वितरण कंपनीकडून कळविण्यात आले की, प्लॉट क्र. एन–१७ एमआयडीसी कुपवाड सांगली येथील कृष्णा सिमेंट यांना उच्चदाब वीज जोडणी देण्यात आली होती. सदर मालमत्तेवरील देणेंच्या रकमा वाढत गेल्यामुळे कोर्टाने त्याच्या वसुली करिता लिलाव करुन सदर मालमत्ता श्री. मगदूम यांनी खरेदी करुन त्यानंतर मे. समृध्दी इंडस्ट्रिज लि. यांना विकली. सदर जागेतील वीज जोडणीचे दि. ३०.६.२००८ रोजी वीज बिलाच्या थकबाकी रकमेपोटी व्याजासह रु. १८,९७,५२५.२९ येणे आहे.



संबंधित पूर्वीच्या जागा मालकाने सदर रक्कम भरली नसल्यामुळे वीज पुरवठा कायमचा बंद करुन वसुलीसाठी विशेष दिवाणी दावा नं. २८७/९६ संबंधितांविरुध्द दाखल केला होता. त्याचा निकाल वितरण कंपनीच्या बाजूने लागला असून त्याचेवरील वसुलीच्या कार्यवाही करिता अपील क्र. १६६/०७ मे. कृष्णा सिमेंट यांच्या विरोधात मा. दिवाणी न्यायालय, वरिष्ठस्तर यांच्या न्यायालयात दावा मूळ रक्कम रु. १०,१२,०६६.३८ व त्यावरील त्यापुढील द.सा.द.शे. ७% दराने व्याज याचा अद्याप निवाडा होणे आहे. दरम्यान नव्याने खरेदी केलेल्या सदर जागेत अर्जदार मे. समृध्दी इंडस्ट्रीज यांनी दि. १५.५.२००८ रोजी नवीन वीज पुरवठ्यासाठी अर्ज केला. वितरण कंपनी अधि. अभि. सांगली मंडल यांनी त्यांचे पत्र क्र. ५४७२ दि. ५.७.२००८ ने पूर्वीच्या वीज जोडणीच्या कायमस्वरुपी बंद केल्याच्या पूर्वीचे सहा महिन्यांची वीज बिलाची रक्कम भरणे व वितरण कंपनीचे मुख्य कार्यालयाचे परिपत्रक क्र. ५३ दि. ७.५.२००७ मधील अटींची पूर्तता करावी असे कळविले आहे.

वरील अटींची पूर्तता केल्यानंतर अर्जदार मे. समृध्दी इंडस्ट्रीज यांनी मागणी केलेल्या नवीन वीज जोडणीस नियामक आयोगाच्या कृती मानकेनुसार वीज पुरवठा करण्यात येईल.

यावर सद्यस्थितीत वीज भार शिल्लक नसल्यामुळे चालू वीज जाळ्यातून सदर वीज जोडणी देणे शक्य नसल्याचे व त्या करिता अतिरिक्त वीज यंत्रणेची उभारणी करुन वीज नियामक आयोगाच्या कृती मानकेनुसार वीज पुरवठा करण्यात येईल अशी वितरण कंपनीतर्फे बाजू मांडण्यात आली.

सदस्य सचिव यांचे मत व म्हणणे

तक्रारदार व वितरण कंपनी यांनी मांडलेल्या बाजू, युक्तीवाद व म्हणणे विचारात घेवून, सदस्य सचिव यांच्यातर्फे खालील प्रमाणे म्हणणे मांडण्यात येत आहे.

अलिकडे उद्योग धंद्याच्या हेतूने वितरण कंपनीकडून व अन्य स्त्रोताकडून संबंधितांकडून वीज पुरवठा, दूरध्वनी सेवा, पाणी पुरवठा, बँकाकडून कर्ज पुरवठा व इतर आवश्यक सुविधा घेतल्या जातात व कालांतराने त्यांच्या अपयशामुळे संबंधित उद्योगधंदे दिवाळखोरीत निघत आहेत. अशावेळी संबंधितांना सेवा पुरविलेल्या इतर माध्यमांप्रमाणेच वीज पुरवठ्याची सेवा वितरण कंपनीकडून प्रामाणिकपणे पुरविली गेलेली असते व

संबंधितांची वीज पुरवठ्याची गरज भागविलेली असते. त्या करिता वितरण कंपनीस खर्च करुन आवश्यक ती वीज वाहिनी तयार करावी लागते. तसेच त्यानंतर संबंधित उद्योगधंद्याने विजेचा वापर केलेला असतो व त्यावरील वापरलेल्या विजेच्या रकमा ह्या संबंधित उद्योगधंदे हे दिवाळखोरीत निघतांना हेतु:पुरस्सर बुडवत आहेत. त्यामुळे वितरण कंपनीने विश्वासाने व अडचणी सोसून केलेल्या वीज पुरवठ्याच्या मोठ्या रकमा अशा प्रकारे वाऱ्यावर सोडता येणार नाही व अशी अनेक प्रकरणे एकत्रित झाल्यास वितरण कंपनीची आर्थिक परिस्थिती डबघाईला येईल. वितरण कंपनी ही सार्वजनिक क्षेत्रातील व्यावसायीक तत्वावर काम करीत असून वीज वाटपातील जमा रकमेमधून तिला प्रशासन चालविणे आहे. वीज खरेदीपासून ते वीज वितरण करेपर्यंत अनेक टप्प्यावर प्रति युनिट वीज पुरवठा करणेस खर्च येत असतो व अशा प्रकारे वितरण कंपनीने केलेल्या वीज पुरवठ्याचा वापर करुन घेवून संबंधित उद्योगधंद्याने वीज वापराच्या थकबाकी रकमा बुडविण्याचा हा प्रकार आहे अशा प्रकारच्या प्रवृत्या क्लृप्त्या वापरुन करण्याचे प्रकार सद्या वाढत आहेत. भल्यामोठ्या थकबाक्यांची अशी एक एक करुन अनेक प्रकरणांची एकत्रित थकबाकी रक्कम विचारांत घेतलेस असा आर्थिक नुकसानीचा फटका वितरण कंपनीस आर्थिक नुकसानीत घेवून जाईल.



ज्या उद्योगधंद्यांना त्यांचे उद्योग कार्यक्षमतेने चालविण्याची कुवत नाही त्यांनी अशा प्रकारे फुकटात वीज वापर करुन घेवून थकबाकी भरण्याच्या बांधिलकीपासून अंग काढून घेवू नये. तसेच वितरण कंपनीने अशा उद्योगधंद्याच्या ग्राहकांना वीज पुरवठा घेणेसाठी कोणत्याही प्रकारची सहानुभूती दाखवू नये तरच असे प्रकार रोखता येतील आणि अशा प्रवृत्या रोखण्याची गरज आहे. कारण अशा प्रकारे सरावलेले, वीज बील थकबाकीच्या रकमांची बुडित करणारे पुन्हा पुन्हा असे प्रकार घडवून आणू शकतात.

म्हणून यास्तव वितरण कंपनीच्या मुख्य कार्यालयाने परिपत्रक क्र. ५३ दि. ७.५.२००७ जावक क्र. पीआर ३/टॅरिफ/२१३७८ ने निर्गमित केलेल्या सन्माननीय न्यायालयाच्या लिलावामध्ये खरेदी केलेल्या मालमत्तेच्या जागेत नवीन वीज पुरवठा देतांना घालून दिलेल्या अटीनुसार – " सन्माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये वि.प.कडून दाखल असलेल्या प्रकरणात वितरण कंपनीने मे. सूपर अॅन्ड स्टेनलेस एच.आय. लि. यांच्या विरोधात केलेला दावा क्र. ५३१२, ५३१३ ऑफ २००५ व दिवाणी याचिका ५३१४ ऑफ २००५ यावर निर्णय होणे आहे व सदर निकाल वितरण कंपनीच्या गोटात जाण्याच्या अपेक्षा गृहीत धरुन त्यानुसार त्या जागेत नवीन वीज पुरवठा घेवू इच्छिणाऱ्या तक्रारदारास त्या जागेतील पूर्वीच्या वीज जोडणीवरील वीज बिलाची पूर्ण येणे थकबाकी रक्कम भरण्याचे हमीपत्र लिहून घेणे. तसेच दरम्यानचे काळात नवे वीज पुरवठा मागणाऱ्या अर्जदाराने वीज नियामक आयोग विनियम वीज पुरवठा अटी विनियम २००५ तरतूद क्र. १०:५ नुसार पूर्वीच्या कायमस्वरुपी बंद केलेल्या वीज जोडणीवरील शेवटच्या सहा महिन्यांची वीज बिलांची रक्कम भरावी. तसेच नवीन येणाऱ्या अर्जदाराने पूर्वीच्या थकबाकीची रक्कम भरण्याची हमीची खात्री म्हणून सदर मालमत्तेवर कायदेशीर पध्दतीने बोजा चढविणेत यावा आणि अशा प्रकारच्या नवीन मालकाच्या मालमत्तेच्या कागदपत्रावर असा बोजा चढविल्यानंतर सदर ठिकाणी नवीन वीज पुरवठा करण्याची कार्यवाही करण्यात यावी " याचे पालन संबंधितांनी करणे आवश्यक आहे. तसेच वितरण कंपनीने सद्या त्या ठिकाणी भार शिल्लक नसल्याचे व त्या ठिकाणी ग्राहकाचा वीज पुरवठा करण्यासाठी वाहिनी, उप केंद्र वगैरे उपाय योजना करावी लागणार असल्याचे वि.प.कडून कळविण्यात आले आहे.

सदर प्रकरणात सदर जागेचे पूर्वीचे मालक मे. कृष्णा सिमेंट यांच्या नांवे वितरण कंपनीने दिलेल्या उच्चदाब वीज जोडणीवर दि. ३०.६.२००८ अखेर मूळ रक्कम अधिक व्याज असे एकूण रु. १८९७५२५.२९ येणे आहे. सदर थकबाकी रक्कम भरण्यातून मूळ मालकाने अंग काढून घेतले आहे व अशी मोठी रक्कम वितरण कंपनीला उघड उघड सोडून देणे आर्थिक नुकसानीचे आहे. त्यामुळे वितरण कंपनीच्या मुख्य कार्यालयाने परिपत्रक क्र. ५३ दि. ७.५.२००७ ने घालून दिलेल्या अटी, नवीन येत असलेल्या सदर जागेच्या मालकाने पालन करण्याचे हमी पत्र वितरण कंपनीस द्यावे व त्यानुसार त्यास मागणी करण्यात आलेले २० अश्वशक्तीचे नवीन वीज जोडणी देणे बाबतची कार्यवाही वितरण कंपनीकडून करण्यात यावी असे सदस्य सचिव यांचे ठाम मत आहे.

दोन्ही बाजूंचे म्हणणे, जबाब, उपलब्ध कागदपत्रें, युक्तीवाद विचारांत घेवून सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच यांजकडून खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) वितरण कंपनीचे मुख्य कार्यालय, मुंबई यांनी निर्गमित केलेले पत्र क्र. पीआर ३/ टॅरिफ/२१३७८ – परिपत्रक क्र. ५३ दि. ७.५.२००७ ने घालून दिलेल्या अटींचे पालन तक्रारदाराने करावे व त्यानंतरच नवीन २० अश्वशक्ती वीज जोडणीला वीज पुरवठा देणेबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

२) वितरण कंपनीकडून सद्यस्थितीत चालू जाळयातून वीज पुरवठा देणे शक्य नसल्याचे कळविले असल्यामुळे व जादा रोहित्र उभारणीची किंवा तत्सम पर्यायाची गरज असल्याने वीज नियामक आयोग कृती मानकेनुसार भरपाई देणे विचारात घेता येणार नाही.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( एस.आर. बांबळे )
सदस्य सचिव,
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : १२.०१.२००९